


# आला पावसाळा; मधपेट्या सांभाळा!



**प्रा. उत्तम सहाणे**
(मो.नं. ७०२८९००२८९)
पीक संरक्षण शास्त्रज्ञ,
कृषी विज्ञान केंद्र,
कोसबाड हिल, ता. डहाणू, जि. पालघर

**पावसाळी वातावरणामुळे हवेत आर्द्रता वाढते. मधपेटीला ओलावा राहिल्यामुळे मेणकिड्याचा प्रादुर्भाव होऊ शकतो. या मेणकिड्याची अळी मधमाश्यांनी बनविलेली पोळी पोखरते. मधमाश्या पोळ्याचा त्याग करून पेटीच्या बाहेर जातात. मधमाश्यांची संख्या कमी असलेल्या मधपेटीमध्ये, विशेषत: पेटीमधील पोळी मधमाश्यांनी पूर्ण झाकलेली नसल्यास अशा पेटीला मेणकिडा लवकर लागतो.**

सातेरी आणि मेलिफेरा या मधमाश्या लाकडी पेटीमध्ये पाळल्या जातात. मधमाश्यांच्या वसाहतीमध्ये प्रजनन हे फक्त एका राणीमाशीमार्फत होत असते. म्हणजे अंडी देण्याचे काम एकमेव राणीमाशी करत असते. कामकरी माश्या बाहेरुन किती अन्न रोज वसाहतीमध्ये आणतात यावर राणीची अंडी देण्याची क्षमता अवलंबून असते. राणी दररोज सरासरी ५०० पासून १००० पर्यंत अंडी देते. परंतु पावसाळ्यात फुले नसतात किंवा फुले कमी असतात. तसेच जास्त पाऊस असताना कामकरी माश्यांना पेटीच्या बाहेर जाता येत नाही. अशा वेळी कामकरी माश्यांकरवी बाहेरुन अन्न म्हणजे पराग आणि मकरंद येत नाही. मग राणीमाशी अंडी देण्याचे काम कमी करते अथवा काही दिवस बंद करते. कामकरी माश्या त्यांचे ५ ते ६ महिन्यांचे आयुष्य





संपले म्हणजे मरत असतात. पर्यायाने पेटीतील संख्याबळ कमी होते. असे झाले तर मेणकिडा नावाची कीड पोळ्यांना लागण्याची दाट शक्यता असते.

पावसाळी वातावरणामुळे हवेत आर्द्रता वाढते. मधपेटीला ओलावा राहिल्यामुळे मेणकिड्याचा प्रादुर्भाव होऊ शकतो. या मेणकिड्याची अळी मधमाश्यांनी बनविलेली पोळी पोखरते. मधमाश्या पोळ्याचा त्याग करून पेटीच्या बाहेर जातात.

### मेणकिडा होण्याची कारणे

मधमाश्यांची संख्या कमी असलेल्या मधपेटीमध्ये

विशेषतः पेटीमधील पोळी मधमाश्यांनी पूर्ण झाकलेली नसल्यास अशा पेटीला मेणकिडा लवकर लागतो.

पोळ्याची साफसफाई करताना निघणारा मेणाचा कचरा मधमाश्या पेटीच्या तळपाटावर टाकतात. इतर माश्या तो प्रवेशद्वारातून बाहेर काढतात. मात्र प्रवेशद्वाराजवळील पट्टीमुळे हा कचरा तेथेच साठून राहतो. त्यावर मेणकिड्याचा पतंग अंडी घालतो तसेच मधपेटीला असलेल्या फटीतून मेणकिडा आत घुसून पोळ्यावर अंडी घालतो.

### योग्य काळजी घ्या

पेटीच्या फटीमध्ये मेणकिड्याची मादी पतंग अंडी घालते. या फटी प्लास्टर ऑफ पॅरिस किंवा चिकट द्रावण व लाकडी भुश्श्याच्या मिश्रणाने किंवा घट्ट गाळाने बुजवाव्यात.

वसाहतीचा तळपाट दर १० ते १५ दिवसांनी झाडून स्वच्छ करावा. त्यातील घाण जाळून टाकावी.

तळपाट स्वच्छ करताना मधमाश्यांनी सोडून दिलेली जुनी किंवा काळी पडलेली पोळी पेटीतून काढून टाकावी व वितळवून त्यांचे मेण बनवावे.

वसाहतीवर अनावश्यक ज्यादा सुपर देऊ नये. अशा सुपरवर जर मधमाश्या चढल्या नाहीत तर त्यामध्ये मेणकिड्याचा प्रादुर्भाव होण्याची जास्त शक्यता असते.

ज्या वसाहतींमध्ये मधमाश्यांची पोळी कमी आहेत अशा वसाहती इतर जास्त सशक्त असलेल्या पेटीतील पिलाव्याची पोळी देऊन सशक्त कराव्यात.

### पावसाळ्यात मधमाश्यांची संख्या कमी होऊ नये म्हणून उपाय योजना

पावसाळ्याच्या दिवसांत कामकरी मधमाश्यांकडून बाहेरुन अन्नाचा पुरवठा कमी प्रमाणात होत असल्याने राणीची अंडी देण्याची क्षमता कमी होते. परंतु रोज काही वयोवृद्ध कामकरी माश्या आयुष्य संपवून मरत असतात. नवीन माश्यांची उत्पत्ती थांबल्यामुळे पोळ्यामधील





संख्याबळ कमी होते अशा वेळी मेणकिड्याचा जास्त प्रादुर्भाव होतो.

### उपाय

जेव्हा संततधार पाऊस असतो तेव्हा माश्या बाहेर जाऊ शकत नाहीत. अशा वेळी मधपेटीत माश्यांसाठी कृत्रिम अन्न म्हणजे साखरपाणी द्यावे किंवा मधपाणी द्यावे.

### साखरपाणी तयार करण्याची पद्धती

एका पेटीसाठी ५० ग्रॅम साखर व तेवढेच स्वच्छ पाणी घेऊन एकत्र करावे. हे द्रावण गरम होण्यासाठी शेगडीवर ठेवावे. साखर विरघळली म्हणजे गॅस बंद करावा. हे साखरपाण्याचे द्रावण थोडा वेळ थंड होऊ द्यावे. नंतर सपाट बशी किंवा पसरट प्लेटमधे ओतून पेटीच्या झाकणाखाली मधमाश्यांच्या फ्रेमवर ठेवावे. या बशीत लाकडाच्या काड्या ठेवाव्या म्हणजे माशीला त्यावर बसून साखरपाणी घेता येते. यावर पेटीचे झाकण ठेवावे. पावसाच्या दिवसांत आठवड्यातून एक किंवा दोन वेळा हे करावे, रोज करु नये.

### या गोष्टींकडे लक्ष द्यावे

मधपेटीत मधमाश्यांची संख्या जास्त राहील याची काळजी घ्यावी. रिकाम्या फ्रेम पेटीत ठेवू नये.

दर १० ते १५ दिवसांनी वसाहतीची तपासणी करून मेणकिड्यांना शोधून त्यांचा नायनाट करावा.

पेटीचे निरीक्षण करताना कामकरी माश्यांच्या हालचाली योग्य आहेत ना, नर माश्यांची घरे जास्त होत नाही ना, नवीन राणीघर तयार होत नाही ना याकडे लक्ष द्यावे.

पावसाळ्यात मधपेटी पावसाच्या पाण्याने भिजू नये म्हणून मधपेटीवर जाड प्लास्टिक पेपरचे झाकण ठेवावे.

पाली, सरडे, बेडूक, लाल मुंगळे मधमाश्यांना भक्ष्य बनवतात. हे लक्षात घेऊन पेटी जमिनीपासून ३ फूट उंचीच्या स्टँडवर ठेवावी. स्टँडच्या पायांना काळे तेल किंवा इंजिन ऑईल लावावे. स्टँडखाली चुलीतील राख टाकावी. ■